# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रा.डॉ. गणेश भामे**
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/२००    दि. १३/०८/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : जिल्हास्तरीय रेड रन(मॅरेथॉन) स्पर्धेमध्ये रासेयो विद्यार्थी सहभागी होण्याबाबत...
संदर्भ : मा. क्लस्टर प्रोग्रॅम मॅनेजर, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रूग्णालय, औंध, पुणे यांचे जा.क्र.जिएप्रनिवि पुणे/जिल्हास्तरीय रेड रन/१२४६–४९/२०२६,दि.११/०८/२०२६

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आंतर राष्ट्रीय युवा दिनानिमित्त सन २०२६–२७ मध्ये आयईसी विभागांतर्गत डापकु मार्फत जिल्हास्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

त्यानुषंगाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता रेड रन स्पर्धा आयोजीत करण्यात येणार आहे. रेड रन स्पर्धेकरिता जिल्हा स्तरावर वय वर्ष १७ ते २५ या वयोगटातील महाविद्यालयातील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतात. सदर रेड रन स्पर्धा ही ०५ कि.मी. अंतराची आहे. सदर स्पर्धा ही पुरूष व महिला अशा दोन गटामध्ये घेण्यात येणार आहे.

तरी आपण आपल्या महाविद्यालयामधील इच्छुक विद्यार्थ्यांना ह्या स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता आवाहन करावे. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता पुढील लिंकवर नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. अधिक माहितीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

नावनोंदणी लिंक :
https://docs.google.com/spreadsheets/d/1VOG_FbjDiCizMYbSkuiEEI7QOCUzaaaNNw1j6a9vyAQ/edit?usp=sharing

Bhame.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

# जिल्हा शासकीय रुग्णालय,पुणे
## जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग,
**औंध, पुणे - २७.**
Email – dspune@mahasacs.org

आरोग्य सेवा

जा.क्र. जिएप्रनिवि पुणे/ जिल्हास्तरीय रेड रन A२४६-४७/२०२६
दि. ११/०८/२०२६

प्रति,
मा.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ,
पुणे

**विषय :- जिल्हास्तरीय रेड रन (मॅरेथॉन) स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्याबाबत.....**

संदर्भ :- १) उपसंचालक, आईसी - मेनस्ट्रिमिंग विभाग, मराएनिसो, मुंबई यांचे जा.क्र मराएनिसं/आईसी/जिकाप्र/२०२६-२७/३७४१-३८१३ दि. २४/०७/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, आंतर राष्ट्रीय युवा दिनानिमित्त सन २०२६ -२०२७ मध्ये आयईसी विभागांतर्गत डापकु मार्फत जिल्हास्तरावर विविध कार्यक्रम आयोजीत केले जातात. त्याअनुषंगाने महाविद्यालयीन विद्यार्थ्याकरिता रेड रन स्पर्धा आयोजीत करण्यात येणार आहे. रेड रन स्पर्धेकरिता जिल्हा स्तरावर वय वर्षे १७ ते २५ या वयोगटातील महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होतील.

सदर रेड रन स्पर्धा ही ०५ कि.मी अंतराची असेल व सदर स्पर्धा ही पुरुष व महिला अशा दोन गटामध्ये घेण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरील रेड रन स्पर्धेमध्ये पुरुष व महिला या दोन्ही गटातून वेगवेगळे २५ याप्रमाणे प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्वावर कमीत कमी ५० (२५ मुले २५ मुली) विद्यार्थ्या सहभागी होतील. सदर स्पर्धेकरिता प्रथम, व्दितीय व तृतीय असे तीन क्रमांक पुरुष व महिला गटातून काढण्यात येतील.

जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धेमध्ये प्रथम व व्दितीय येणा-या पुरुष व महिला स्पर्धकास राज्यस्तरीय रेड रन स्पर्धमध्ये सहभागी होता येईल. जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धेमधील विजेत्यांना रोख रककम, प्रमाणपत्र, मेडल व इतर सहभागीना प्रमाणपत्र व मेडल देण्यात येईल.

रेड रन बक्षिस :-

मुले बक्षिस :- प्रथम विजेता - रु. २५००/-
व्दितीय विजेता - रु. २०००/-
तृतीय विजेजा - रु. १५००/-
मुली बक्षिस :- प्रथम विजेता - रु. २५००/-
व्दितीय विजेता - रु. २०००/-
तृतीय विजेजा - रु. १५००/-

जिल्हा स्तरीय **रेड रन (मॅरेथॉन) मध्ये** सहभागी होण्यासाठी लिंक पाठविण्यात येईल त्यामध्ये जे विद्यार्थ्या (मुले व मुली) मॅरेथॉन स्पर्धेकरिता वैद्यकीय मेडिकल दुष्टया सक्षम असलेल्या व सहभागी होण्यास इच्छुक आहे. त्यांचे रजिस्ट्रेशन करण्यात यावे.

तरी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, अंतर्गत महाविद्याल विद्यार्थ्यांना रेड रन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्याकरिता आवाहन करण्यात यावे,

क्लस्टर प्रोग्रॉम मॅनेजर,
जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग,
जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे.

प्रत माहितीस्तव,
१) मा.प्र.कुलगुरु, सावित्रीबाई फुले,पुणे विद्यापीठ,पुणे
२) मा. जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे.
३) ३) मा. उपसंचालक, आईसी - मेनस्ट्रिमिंग विभाग, मराएनिसो, मुंबइ